# रे.दि.मु.नं.०६/२०१२

**नि.१७ खालील आदेश :—**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात दुरुस्ती करणेकामी सादर केला आहे.

२. वादी व प्रतिवादी यांचे वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

३. वादीचे म्हणण्यानुसार दि.१३/०२/२००८ रोजी वादी व प्रतिवादी यांचे सख्खे भाउ शशिकांत उर्फ दत्तात्रय नामदेव शिंदे यांचेकडून रावडी बुद्रुक येथील गट नं. ३४ व ३५ या मिळकती कायम स्वरुपी दस्ताने वादीने खरेदी घेतल्या आहेत. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांनी वादीचे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशा मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. तसेच शशिकांत उर्फ दत्तात्रय नामदेव शिंदे यांनी सदरचा दस्त करुन दिला आहे असा जाहीर ठराव करुन मिळणेसाठी दावा केला आहे. वादीचे म्हणणेनुसार शशिकांत उर्फ दत्तात्रय नामदेव शिंदे हे सहीसाठी उपलब्ध होउ शकले नाही म्हणून त्यांना दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील केलेले नाही. वादीचे म्हणणेनुसार सदर शशिकांत उर्फ दत्तात्रय नामदेव शिंदे यांना दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणे गरजेचे आहे.

४. प्रतिवादीचे म्हणणेनुसार वादीने सुचित केलेली दुरुस्ती मूळ दाव्याशी विसंगत आहे. प्रतिवादीचे म्हणणेनुसार मूळ दव्यामध्ये चुक दुरुस्ती केल्याची माहीती वादीस दावा करतेवेळी होती. प्रतिवादीचे म्हणणेनुसार वादीचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करण्यास पात्र नाही.

५. दोन्ही पक्षाचे वादकथन विचारात घेता, असे दिसून येते की, शशिकांत उर्फ दत्तात्रय नामदेव शिंदे हे प्रस्तुतचे दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. तसेच सदर दाव्यात त्यांना आवश्यक पक्षकार म्हणून सामील केल्यास दाव्याचा योग्य निवाडा करण्यास मदत होईल. म्हणून वादीचा अर्ज मंजूर करणेस पात्र आहे. परिणामी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने सुचित केलेली दुरुस्ती आजपासुन १४ दिवसाचे आत करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

फलटण (एल.डी.गायकवाड)

दिनांक: १३/०६/२०१२ दिवाणी न्यायाधिश फलटण